| MHKO160006652021 | **<u>किरकोळ दिवाणी दावा क्र.३८/२०२१ मधील निशानी क्र १३ आणि १६ वरील संयुक्तिक आदेश</u>** |
|---|---|

**०१.** त्रयस्त अर्जदार यांनी प्रस्तुतचे अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १ नियम १० प्रमाणे पक्षकार म्हणून त्यांना सामील करणेसाठी दाखल केलेले आहेत.

**०२.** त्रयस्त अर्जदार श्रीपती रामनाक उर्फ रामु कांबळे व शामू रामनाक उर्फ रामु कांबळे यांनी असे कथन केले आहे की मूळ अर्जदार याचा दगडू भाऊ कांबळे याच्याशी कोणताही संबंध नसून अर्जदारास मयत दगडू भाऊ कांबळे याने कधीही दत्तक घेतलेले नाही. मयत दगडू भाऊ कांबळे यांचे वारस कोण आहेत याबाबत रे.क.क्र.७८/२०२१ या वाटपाच्या दाव्यामध्ये निर्णय होऊ शकतो. सदरचा दावा हा प्रस्तुत त्रयस्त अर्जदारांनी दाखल केला असल्याने प्रस्तुत कामात त्यांना त्रयस्त गैरअर्जदार म्हणून समाविष्ट करणेची विनंती केली आहे.

**०३.** मूळ अर्जदार यांनी सदर अर्जास नि.१७ वर म्हणणे देऊन त्रयस्त अर्जदारांची सर्व कथने नाकारली आहेत. अर्जदाराच्या कथनानुसार मयत दगडू भाऊ कांबळे हे त्यांचे वडिल असून त्याबाबतचे दत्तकपत्रक रजिस्टर दस्त पुस्तक क्रमांक ४, दस्त क्र.२३/१९९४, दि.१५/०१/१९९४ रोजी झालेले आहे. प्रस्तुतचे त्रयस्त अर्जदार मयत दगडू भाऊ कांबळे यांचे नातेवाईक नसलेने त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करता येणार नाही. प्रस्तुतचे अर्ज केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने केलेले असून त्यांनी अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

**०४.** मी मूळ अर्जदार, त्रयस्त अर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील सर्व कागदपत्रें यांचे अवलोकन केले आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा मूळ अर्ज बॉबे रेग्युलेशन कायदा १८२७ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे. मूळ अर्जदाराच्या कथनावरून असे दिसून येते की मयत दगडु भाऊ कांबळे यांनी मूळ

अर्जदारास दत्तकपत्रक रजिस्टर दस्त पुस्तक क्रमांक ४, दस्त क्र.२३/१९९४, दि.१५/०१/१९९४ नुसार दत्तक घेतलेले आहे. मयत दगडू भाऊ कांबळे यांना अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. परंतू त्रयस्त अर्जदारांनी तथाकथित दत्तक पत्र नाकारले असून त्रयस्त अर्जदारांच्या कथनानुसार मयत दगडु भाऊ कांबळे यांना नानुबाई नावाची बहिण सरळ वारस होती. त्याचबरोबर प्रस्तुत त्रयस्त अर्जदार हे मयत दगडु भाऊ कांबळे यांचे चुलत पुतणे आहेत. मयत नानुबाई हीचे पती निवृत्ती जोती कांबळे यांच्याविरूध्द प्रस्तुत त्रयस्त अर्जदारांनी दिवाणी कज्ञा क्र.७८/२०२१ हा वाटपाचा दावा दाखल केला असून तो प्रलंबित आहे. सदर दाव्यामध्ये लोणाळे येथील मिळकतींचा समावेश केला आहे. सबब, उपरोक्त बाबींचा विचार करता त्रयस्त अर्जदारांनी मूळ अर्जदाराचे दत्तकपत्र नाकारले असल्याने व मयत दगडू भाऊ कांबळे यांना नानुबाई नावाची बहिण असल्याचे कथन केल्यामुळे प्रस्तुत अर्ज गुणदोषावर निकाली काढण्यासाठी व सत्यपरिस्थिती अभिलेखावर येण्यासाठी त्रयस्त अर्जदार यांना प्रस्तुत अर्जामध्ये पक्षकार करणे आवश्यक वाटते. उपरोक्त कारणांनुसार त्रयस्त अर्जदारांचे अर्ज मंजूर करण्यास पात्र असलेने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नि.१३ व नि.१६ मंजूर करण्यात येत आहेत.

२. त्रयस्त अर्जदार श्रीपती रामनाक उर्फ रामु कांबळे व शामू रामनाक उर्फ रामु कांबळे यांना सदर अर्जाचे कामी वि.प.क्र. १ व २ म्हणून सामील करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी वरीलप्रमाणे नमूद दुरूस्ती करून दुरूस्त प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

३. खर्चाचा आदेश अंतिम आदेशावर अवलंबून राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Pankaj
Bhimrao
Pawar

**दिनांक- १२/०८/२०२५**

**( पी. बी. पवार )**

**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**

**मलकापूर-शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**